क्रमांक:- एनओटी-३६१७/सीआर-२२/२०१७/तीन दिनांक:- २७ जुलै, २०१७

# घोषणा

**विषय:- लिपिक - टंकलेखक (मराठी/इंग्रजी) मुख्य परीक्षा - २०१७ – अर्ज सादर करण्याबाबत**

जाहिरात क्रमांक ०५/२०१७, दिनांक ६ एप्रिल, २०१७ नुसार आयोगामार्फत दिनांक ११ जून, २०१७ रोजी घेण्यात आलेल्या लिपिक - टंकलेखक (मराठी/इंग्रजी) पूर्व परीक्षा - २०१७ चा निकाल दिनांक २७ जुलै, २०१७ रोजी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे. सदर निकालाधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या प्रत्येक उमेदवाराला आयोगाकडील नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर एसएमएसद्वारे वैयक्तिकरित्या कळविण्यात येत आहे.

**२.** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवाराने दिनांक **२७ जुलै, २०१७ ते १० ऑगस्ट, २०१७** या कालावधीतच आयोगाच्या http://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळाद्वारे अर्ज सादर करणे तसेच विहित कालावधीत परीक्षा शुल्काचा भरणा करणे आवश्यक आहे.

**३.** आयोगास अर्ज सादर करण्याची तसेच परीक्षा शुल्काचा भरणा करण्याची कार्यवाही विहित कालावधीत पुर्ण न केल्यास यासंदर्भातील तक्रारींची नंतर दखल घेतली जाणार नाही.

**४.** परीक्षेच्या प्रवेशासंदर्भात विहित दिनांकानंतर संपर्क साधल्यास त्याचा कोणत्याही प्रकारे विचार केला जाणार नाही.

ठिकाण:- मुंबई

सुनिल अवताडे
उप सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग